महाराष्ट्र शासन
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु),
अधिष्ठाता यांचे कार्यालय, डॉ. ॲनीबेझंट रोड,वरळी, मुंबई ४०० ०१८.
०२२ - २४९३४२१४ फॅक्स . ०२२ - २४९३६८८१
(website :- www.ayurvedinstitute.com, email :- deanrapmc@gmail.com)

जा.क्र. राआपोम/भांडार/वायो १८-१९/२०१८ दिनांक :- ०३.१२.२०१८

प्रति,

......................................................

......................................................

......................................................

......................................................

विषय:- <u>दरपत्रक ( Quotation ) सादर करणेबाबत.</u>
<u>CCTV Surveillance System for College</u> खरेदी करणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, वार्षिक योजना २०१८-१९ अंतर्गत मंजूर नियतव्ययातून महाविद्यालय तथा संलग्नित म.आ.पोदार रुग्णालयाचे बळकटीकरण तथा श्रेणीवर्धन याकरीता मंजूर निधीतून यंत्रसामुग्री खरेदी करणेकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

आपणांस सूचित करण्यात येते की, महाविद्यालयाकरिता CCTV Surveillance System for College सोबत जोडण्यात आलेल्या विनिर्दिष्टानुसार खालील नमूद यंत्रसामुग्रीचा पुरवठा करणेसाठी कमीत कमी दराची मोहोरबंद पाकिटातील दरपत्रके दिनांक २१.१२.२०१८ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने अधिष्ठाता यांचे कार्यालयात खालील नमूद अटी व शर्ती यांच्या अधिन राहून सादर करण्यात यावीत.

| अ.क्र. | यंत्रसामुग्रीचे नाव | विनिर्दिष्टे (Specification) | आवश्यक नग |
|---|---|---|---|
| ०१ | CCTV Surveillance System for College | सोबत जोडण्यात आलेल्या सहपत्रानुसार (Annexure –A) | As per Specification |

## अटी व शर्ती

१. दिनांक २१.१२.२०१८ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रक सादर करताना अशा प्रकारच्या खरेदीवर शासनाकडून आकारले जाणारे विविध कर (taxes)स्वतंत्रपणे नमूद करावेत.

३. दरपत्रक सादर करतेवेळी यंत्रसामुग्री पुरवठा करणेसाठी आपले काही शुल्क/दर असल्यास ते देखिल स्वतंत्रपणे नमूद करावेत.

४. दरपत्रक सादर करताना GST क्रमांक नमूद असलेल्या लेटरहेडवर सादर करावे.

५. ज्या यंत्रसामुग्रीकरिता दरपत्रक सादर करण्यात येत आहे ते I.S.I ( आय.एस.आय) चिन्हांकित असेल तर ठळकपणे नमूद करावे.

६. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील.

७. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रकधारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्सक्ष संबध वा सहभाग नसावा. आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

८. यंत्रसामुग्री खरेदी प्रश्नात यंत्रसामुग्री करीता देण्यात येणारा हमी कालावधी ( Warranty Period) ठळकपणे नमूद करावा.

९. दरपत्रकासोबत ज्या यंत्रसामुग्रीकरिता दरपत्रक सादर सादर करण्यात येत आहे त्या यंत्रसामुग्रीची विस्तुत माहिती असलेले माहिती पत्रक (ProductCatalogue ) जोडावे.

१०. दरपत्रक सादर करतेवेळी मोहोरबंद/सीलबंद पाकिटांवर " CCTV Surveillance System for College **यंत्रसामुग्री करीताचे दरपत्रक**" असे स्पष्टपणे नमूद करावे.

११. खरेदी प्रक्रिया, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी लेखी नमूद करावयाच्या कारणांमुळे रदद करण्याचे अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

१२. विहीत कालावधीत प्राप्त दरपत्रके दिनांक २६.१२.२०१८ रोजी स. ११.०० वा. अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्यात येतील त्यावेळी कंपनीच्या एका प्रतिनिधीस स्वखर्चाने हजर राहण्याची मुभा राहील.

१३. दरपत्रक उघडल्यानंतर आपण सादर केलेल्या यंत्राच्या विर्निदिष्टानुसार ( Specification) सदर यंत्राची प्रत्यक्ष पडताळणी व आवश्यकता वाटल्यास चाचणी महाविद्यालयातील संबधित तज्ञामार्फत करण्यात येईल. त्याकरिता आपण आवश्यक ती व्यवस्था करुन ठेवावी.

१४. पुरवठादाराने सदर खरेदी संदर्भातील आवश्यक माहिती यासोबतच्या प्रपत्रात (Annexure -B) मध्ये सादर करावी.

( वैद्य गो.या.खटी)
अधिष्ठाता
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय(आयु),
वरळी, मुंबई १८.

सहपत्र ( Annexure - A)

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय ( आयु.), वरळी, मुंबई - १८.

SPECIFICATION OF CCTV Surveillance System for College

| अ.क्र. | दरपत्रकाद्वारे आवश्यक असलेले विनिर्दिष्टे Quotation Specification as asked in the quotation | पुरवठादाराने प्रस्तावित केलेली तत्सम विर्निदिष्टे कंपनीच्या नाव आणि उत्पादक कंपनीच्या नावासहित Equivalent specifications quoted by the supplier with the name of the manufacturer | पुरवठादाराने नमूद केलेली विनिदिष्टे दरपत्रकान्वये विचारणा करण्यात आलेल्या विनिर्दिष्टानुसारस आहेत किंवा नाही. प्रत्येक बाबी समोर होय किंवा नाही स्पष्टपणे नमूद करावे Whether the specification quoted by the supplier is as per specification asked for. Indicated against each item clearly YES/NO | पुरवठादाराने नमूद केलेली विर्निर्दिष्टे व दरपत्रकान्वये विचारणा करण्यात आलेल्या विर्निदिष्टे यामध्ये काही बदल वा तफावत असल्यास प्रत्येक बाबीसमोर स्पष्टपणे नमूद करावे. If the specification quoted is not as per specification then variation /deviation should be clearly indicated against each item asked for. |
|---|---|---|---|---|
| १. | Make: EUROVIGIL<br>CCTV CAMERA SURVEILLANCE SYSTEM for college<br>EUROVIGIL SMART RECORD HD 16C – 16 CHANNEL HD DVR<br>EUROVIGIL I-VIEW 200 IR BULLET CAMERAS for Libraby building & Boys hostel - Qty 16 Cameras<br>EUROVIGIL IP Camera for Classroom (Central Building) -Qty 2 cameras<br>EUROVIGIL 12 V 8 AMPS POWERSUPPLY FOR I VIEW CAMERAS - Qty 02<br>EUROVIGIL 12 V 8 AMPS POWERSUPPLY FOR IP CAMERAS Qty 02<br>EUROVIGIL SURVILLENCE HARD DISK 4 TB (1 MONTH BACKUP) - Qty 01<br>32 INCHES TV FOR CAMERA OUTPUT - Qty 01<br>RACK FOR DVR- Qty 01<br>CCTV CABLING IN CONDUITS ACTUAL AS PER METER | | | |

Name of the Supplier/Manufacture with Stamp

Annexure - B

कंपनीच्या लेटरहेडवर खालील नमूद तपशिलाप्रमाणे माहिती भरणे

प्रति,
अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.),
वरळी, मुंबई -१८.

**वार्षिक योजना २०१८-१९**

............................................................ या यंत्रसामुग्री करीताचे दरपत्रक

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नाव | |
| २ | कंपनीचा पत्ता,दुरध्वनी ई-मेल आयडीसहित | |
| ३ | कंपनीचा नोंदणी क्रमांक ( Registration No.) | |
| ४ | यंत्राचे नाव आणि मॉडेल क्रंमाक | |
| ५ | विर्निर्दिष्टे ( सोबत जोडण्यात आलेल्या सहपत्रानुसार) Annexure-A | |
| ६ | GST No. | |
| ७ | शासनाचे कर | |
| ८ | इतर कर | |
| ९ | सदर यंत्राचा इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयास पुरवठा केला असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्र. अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत | |
| १० | हमी कालावधी ( Warranty Period ) | |
| ११ | यंत्राची माहिती पुस्तिका/पत्रक | |
| १२ | हमी पत्र | |
| १३ | इतर अटी व शर्ती असल्यास | |

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराच्या अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

## हमीपत्र -१ ( Undertaking )

मी M/s. ..........................................................................................................

पत्ता :- ..........................................................................................................
लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत ......................................................
खरेदी करणेसाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :-

पुरवठादारांच्या अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह

दिनांक :-

..........................................................................................................

## हमीपत्र-२ ( Undertaking )

मी M/s. ..........................................................................................................

पत्ता :- ..........................................................................................................
लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत ......................................................
खरेदी करणेसाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :-

पुरवठादारांच्या अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह

दिनांक :-